प्रेसनोट दि.०२/११/२०१७

डि.एस.के. ग्रुप ऑफ कंपनीचे दिपक सखाराम कुलकर्णी व हेमंती दिपक कुलकर्णी यांचे विरुध्द शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं.३४७/१७ भा.दं.वि.क.४०६,४२०,३४ महाराष्ट्र ठेविदारांचे हितसंबंधाचे अधिनियम १९९९ कलम ३,४ प्रमाणे अन्वये दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेमार्फत करण्यात येत आहे.

या संदर्भात फिर्याद दाखल झाली तेव्हा ४१ ठेवीदारांनी आपले तक्रार अर्ज दाखल केले होते. दि. ०१/१०/२०१७ रोजीपर्यंत २५८ ठेवीदारांनी तर दि २/११/२०१७ रोजीपर्यंत ५२ असे अदयापपर्यंत एकुण ३५१ ठेवीदारांनी आपले तक्रारी अर्ज दाखल केले आहेत. यातुन अंदाजे रु १२ कोटी पर्यत रकमेची फसवणुक झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

आज गुन्हयाचे तपासात ४ विशेष पथकांनी डि.एस.के. चे पुणे व मुंबई येथील कार्यालय व निवासस्थानी ३ ठिकाणी एकाच वेळी छापे घालुन गुन्हयाचे अनुषंगाने महत्त्वाची माहिती संकलित केली व पुरावे हस्तगत केले आहेत.

या गुन्हयाचे तपासाकरिता आर्थिक गुन्हे शाखेचे सहा.पोलीस आयुक्त श्री. मिलिंद पाटील यांचे देखरेखीखाली एक विशेष तपास कक्ष तयार करण्यात आला आहे. गुन्हयाचा शिघ्रगतीने तपास व्हावा म्हणुन त्यात ५ पोलीस निरीक्षक दर्जाचे, ४ सहा.पो.नि./ पोउपनि दर्जाचे अधिकारी व २० पोलीस कर्मचारी यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर कक्ष आर्थिक गुन्हे शाखा, संगम ब्रिज, पुणे येथे कार्यरत राहील. या तपास पथकास तज्ञांचे मार्गदर्शन व्हावे म्हणुन त्यात सहा.सरकारी वकील, निवृत्त शासकीय लेखा परिक्षक, फॅारेन्सिक ऑडीटर यांचा देखील समावेश करण्यात आला आहे.

या गुन्हयातील बळी पडल्या नागरिकांना मदत व्हावी म्हणुन सकाळी १०.०० ते १७.३० वा पर्यत संगमब्रिज, पुणे कार्यालयात दुरध्वनी क्र. ०२०-२५५४००७७ वर हेल्पलाईन सुध्दा सुरु करण्यात येत आहे.

ज्या नागरिकांना त्यांचे फसवणुकीबाबत माहिती दयावयाची असेल त्यांनी आर्थिक गुन्हे शाखा संगम ब्रिज येथे उपस्थित राहुन तेथे उपलब्ध करुन देण्यात येणा-या फॉर्म मध्ये आपली माहिती भरुन दयावी.

फसवणुक झाले नागरिकांना गुन्हयांचे तपासाबाबत अदयावत माहिती मिळावी व त्यांनी अफवांना बळी पडु नये म्हणुन त्यांचे व्हॉटस्अप ग्रुप बनवुन त्यावर नागरिकांना माहिती देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक शनिवारी आर्थिक गुन्हे शाखा कार्यालय, संगम ब्रिज, पुणे येथे फसवणुकीला बळी पडलेल्या नागरिकांची बैठक घेवुन तेथे सुध्दा त्यांना गुन्हयाचे तपासाचे प्रगतीबाबत माहिती देण्यात येवुन त्यांचे शंका निरसन केले जाणार आहे. गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, श्री.संजय कुरुंदकर हे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे ) श्री.प्रदीप देशपांडे व पोलीस उप आयुक्त आर्थिक व सायबर, गुन्हे शाखा, श्री.सुधीर हिरेमठ यांचे मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

Shiremath.